नियमित दिवाणी दावा क्र.९३/२०२३
संभाजी विरुध्द विलास
CNR:MHSN14-000510-2023

## नि.क्र. १७ वरील आदेश

प्रतिवादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द 'कैफियत नाही' असा झालेला आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, प्रतिवादींनी वेळेत कैफियत दिली नाही म्हणून दिनांक २१/०६/२०२४ रोजी त्यांच्याविरुध्द विना कैफियतचा हुकूम झाला. प्रतिवादीला दाव्यास कैफियत देणे आवश्यक आहे. प्रतिवादीविरुध्दचा सदर हुकूम रद्द केला नाही तर त्याचे पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे व त्यांना न्यायापासून वंचित व्हावे लागणार आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

३. वादी तर्फे प्रस्तुत अर्जावरच म्हणणे दाखल करुन असे कथन करण्यात आले की, अर्जात कोणतेही सबळ कारण नमूद नाही. सदरचा दावा अंतिम युक्तिवादास आलेला आहे. वेळावेळी प्रतिवादी व वकीलांनी हजर राहून देखील चालढकल व वेळ काढूपणा केला आहे. प्रतिवादीनी वादीचा, वकीलांचा व कोर्टाचा वेळ वाया घालविला. त्यांचा हेतू प्रामाणिकपणाचा नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा. अर्ज मंजूर करण्याचा झाल्यास प्रतिवादीची वर्तवणूक पाहता र.रु. ५०००/- कॉस्ट करण्यात यावी व ती वादीला देण्यात यावी.

४. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. अर्ज व म्हणणे पाहिले. प्रकरणाचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादी हे दि. ०८/१२/२०२३ रोजी प्रकरणात हजर झाले. मात्र, त्यांनी दाव्यास कैफियत दाखल केली नाही. त्यामुळे दिनांक २१/०६/२०२४ रोजी त्यांचेविरुध्द विना कैफियत आदेश पारीत झाला. तद्नंतर वादीतर्फे पुरावा नोंदविण्यात येऊन दिनांक २५/११/२०२४ रोजी प्रतिवादीचा पुरावा बंद करण्यात आला व प्रकरण युक्तिवादासाठी नेमण्यात आले. तद्नंतर दिनांक २८/०२/२०२५ रोजी प्रतिवादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज कैफियतीसह दाखल करण्यात आला. प्रतिवादींनी त्यांना

कैफियत का दाखल करता आली नाही याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण अथवा कारण अर्जामध्ये नमूद केलेले नाही. प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचे देखील हक्क हितसंबंध आहेत. त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत देण्याची संधी देणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. मात्र, झालेला विलंब विचारात घेता प्रतिवादींवर रक्कम रु. २,०००/- खर्च बसवून अर्ज मंजूर केल्यास न्यायोचित होणार आहे. त्यामुळे उभय पक्षांपैकी कोणाचेही नुकसान होणार नाही. दावा गुणदोषांवर चालवून निकाली करणेस मदत होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. प्रतिवादीनी वादीस रक्कम रु. २०००/- खर्च देण्याच्या अटीवर अर्ज नि.क्र. १७ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींतर्फे खर्च रक्कम रु. २०००/- वादीस दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेणेत यावी.

DESAI VINAYA ATMARAM
Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2025.06.20 17:56:35 +0530

शिराळा (व्ही. ए. देसाई)

दिनांक २०/०६/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा.

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.S.Patil |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 20/06/2025 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 20/06/2025 |
| Order uploaded on | : | 21/06/2025 |